दि. 16/09/2026

# प्रेसनोट

## पोलीस उप महानिरीक्षक यांच्या पथकाकडून अहमदपूर येथे गुटखा जप्त

नांदेड परिक्षेत्रातील अवैध व्यवसायांना पायबंद घालण्यासाठी पोलीस उपमहानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी लातूर जिल्हयात हद्दीत पोलीस पथक पाठविले होते.

सदर पथकाने, दिनांक 15.09.2026 रोजी, पोलीस ठाणे अहमदपुर हद्दीतील मौजे उगिलेवाडी येथील घरामध्ये छापा टाकून, सदर ठिकाणाहून 1,16,880/- रुपयांचा गुटखा जप्त केला आहे. या प्रकरणी सुधीर सुर्यकांत बेंबडे व अतुल सुर्यकांत बेंबडे रा. उगिलेवाडी, ता. अहमदपुर, जि. लातूर यांच्याविरुद्ध अहमदपुर पोलीस ठाणे येथे गुरनं 614/2026 कलम 123, 223, 274, 275, 3(5) भारतीय न्याय संहितान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर कारवाईत, पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे यांचेसह पोहेकॉ/ प्रदिप खानसोळे, पोहेकॉ/ गणेश राठोड व पोहेकॉ/ गजानन डवरे यांनी सहभाग घेतला. पथकाच्या उल्लेखनीय कामगिरीबाबत पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी पथकातील अधिकारी व अंमलदारांचे अभिनंदन करून त्यांना प्रोत्साहित केले आहे.

**' खबर ' हेल्पलाइन वरुन माहिती द्या :** अवैध व्यवसायांची माहिती थेट पोलीसांना पोहोचविता यावी, या दृष्टिकोनातून, पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालयाने 91 50 100 100 हा मोबाईल क्रमांक असलेली 'खबर' नावाची हेल्पलाइन सुरू केली असून, सदर हेल्पलाइन वरून नागरिकांनी आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयापर्यंत पोहचवावी, असे आवाहन नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उप महानिरीक्षक श्री. शहाजी उमाप यांनी केले आहे.

पोलीस उप महानिरीक्षक कार्यालय,
नांदेड परिक्षेत्र, नांदेड